महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
Maharashtra Electricity Regulatory Commission

क्र:मविनिआ/माअअ/100/2018/027

दि.15.01.2019

**प्रति,**
श्री. दामोदर पारिक,
नवजीवन कॉलनी, मु.पो. ता. वैजापूर,
जिल्हा- औरंगाबाद- ४२३ ७०१

**विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.**

महोदय,

आपला दि. १७.१२.२०१८ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. २०.१२.२०१८ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No. | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| 1 | औरंगाबाद येथील CGRF वर CPO म्हणून श्री. विलासचंद्र सुरजमलजी काबरा हे दि. २९.१०.२००९ पासून आज पर्यंत कार्यरत आहेत म्हणजे त्यांची ही चौथी टर्म आहे. सदर व्यक्तीस CPO पदावर नियुक्तीसाठी चार वेळा (वेळोवेळी) जोडलेल्या ग्राहक संघटनांचे/सामाजिक संघटनांचे तत्सम इतरांचे शिफारस पत्रांच्या नकलांच्या प्रमाणित प्रती मला देण्यात याव्यात. | आपणांस आवश्यक असलेली माहिती आयोगाच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. सदर संचिकेत छायांकित प्रतींची संख्या २४६ इतकी आहे. |
| 2 | दि. २३ जानेवारी, २०१८ रोजी आपल्या कार्यालयात महावितरणच्या औरंगाबाद परिमंडळाच्या ग्राहक गाऱ्हाणी निवारण मंचा वरिल सदस्य (ग्राहक संरक्षण संस्था) या पदासाठी अर्ज दाखल केलेल्या सर्व उमेदवारांच्या संचिकेच्या नकला मला देण्यात याव्या ज्यात निवड समिती सदस्य व इतर संमधितांनी ज्यांनी ज्यांनी काही शेरे, टिपण्या, अभिप्राय व आदेश यांचा देखील समावेश असावा. थोडक्यात सदर संचिका मुख पृष्ठ ते मल पृष्ठ मला देण्यात यावी. | |

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
Tel.: 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 Fax : 022-2216 3976
E-mail : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in Website : www.merc.gov.in / www.mercindia.org.in

जर आपणांस सदर छायांकित प्रती हव्या असल्यास, माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियमन) नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार पुढीलप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

| मागणी केलेली माहितीची छायांकित प्रतीची एकूण पृष्ठे | प्रती पृष्ठ शुल्क रु. | एकूण माहिती शुल्क रु. | टपाल खर्च रु. (माहिती अर्जदार स्वत: घेऊन जाणार असल्यास टपाल खर्च आवश्यक नाही.) | एकूण रु. |
|---|---|---|---|---|
| २४६ | २ | ४९२/- | अंदाजे रु. ३००/- | ७९२/- |
| | | | एकूण रु. | ७९२/- |

वरीलप्रमाणे आकारलेले शुल्क आपण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई या नावाने धनाकर्ष अथवा कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष रोख रक्कम रू. ४९२/- जमा करुन शुल्क भरल्याची पावती/चलन पुरावा सत्य प्रत समक्ष सादर करुन आपणांस हव्या असलेल्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील.

आयोगाच्या कार्यालयातील प्रथम अपीलीय अधिकारी श्री. अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई हे आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम १९ (१) अन्वये सदर पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

सही/-
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी

15.01.2019